# पोलीस अधीक्षक कार्यालय , उस्मानाबाद

## " प्रेस नोट "

पान संख्या :- ०२ वार :- रविवार

दिनांक :- १०/०२/२०१९

---

### " उस्मानाबाद जिल्हयात जुगार अडयावर छापे ५,७३०/- रु चा माल जप्त "

**पोलीस स्टेशन तुळजापुर :-** दिनांक ०९/०२/२०१९ रोजी १५.३० वा. सु. दिनदयाल उपाध्याय कॉम्पलेक्स तुळजापुर येथे कुलदीप अनिल गरड रा. वासुदेव गल्ली तुळजापुर याने बेकायदेशीर रित्या स्वत:चे फायदयसाठी कल्याण मटका नावाचा जुगार येणारे जाणारे लोकांना कमी पैशात जास्त पैशाचे आमीष दाखवुन खेळत व खेळवीत असताना मिळुन आला. त्याचे कब्जात कल्याण मटका जुगाराचे साहित्य व रोख रक्कम ५,७३०/-रु माल मिळुन आला. म्हणुन त्याचे विरुध्द दिनांक ०९.०२.१९ रोजी पोलीस स्टेशन तुळजापुर येथे म.जु.का. चे कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन कुलदीप अनिल गरड यास अटक करण्यात आली आहे.

### " उस्मानाबाद जिल्हयात दारु अडयावर छापे २,४००/- रु चा माल जप्त "

**पोलीस स्टेशन उस्मानाबाद (ग्रामीण) :-** दिनांक ०९/०२/२०१९ रोजी १८.०० वा. सु. कौंडगाव तांडा येथे श्रीराम मनोहर राठोड रा. कौंडगाव तांडा, ता. जि. उस्मानाबाद याने विनापास परवाना बेकायदेशीर रित्या गा.ह.भ. दारुचा चोरटा विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने २० लिटर गा.ह.भ. दारु किं. अं. १२००/- रु. चा माल स्वत:चे कब्जात बाळगलेला मिळुन आला. म्हणुन त्याचे विरुध्द दिनांक ०९.०२.१९ रोजी पोलीस स्टेशन उस्मानाबाद (ग्रामीण) येथे म.दा. का. चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन श्रीराम मनोहर राठोड यास अटक करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन बेंबळी :-** दिनांक ०९/०२/२०१९ रोजी १७.३० वा.सु. आरोपीत महिलेचे घरासमोर केशेगाव येथे आरोपीत महिलेने विनापास परवाना बेकायदेशीर रित्या देशी दारुचा चोरटा विक्री व्यवसाय करण्याचे उद्देशाने देशी दारुच्या २० बाटल्या किं अं. १२००/- रु. चा माल स्वत:चे कब्जात बाळगुन देशी दारुचा माल जागेवर सोडुन पोलीसांना पाहुन पळुन गेली म्हणुन आरोपीत महिले विरुध्द दिनांक ०९.०२.१९ रोजी पोलीस स्टेशन बेंबळी येथे म.दा.का.चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### " उस्मानाबाद जिल्हयात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११० लोकांवर कारवाई "

**उस्मानाबाद जिल्हा :-** दिनांक ०९/०१/२०१९ रोजी एका दिवसामध्ये उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस स्टेशन अंतर्गत व वाहतुक शाखा उस्मानाबाद येथील अधिकारी / कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकाविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या कलमा नुसार एकूण ११० केसेस केलेल्या आहेत. त्यापोटी २४ हजार रुपये एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

### " मौजे जळकोट गावाजवळ हयगईने व बेदरकारपणे वाहन चालविले म्हणुन गुन्हा नोंद "

**पोलीस स्टेशन नळदुर्ग :-** दिनांक ०९.०२.१९ रोजी १७.५० वा. सु. जळकोट गावाचे पुढे पुलाजवळ गणपती राम गुड्डु रा. अणदुर ता. तुळजापुर याने त्याचे ताब्यातील छोटा हत्ती वाहन क्र. एम. एच. १३ ए. एन. १८०२ हा सार्वजनिक रोडवर हयगईने व बेदरकारपणे चालवताना मिळुन आला म्हणुन त्याचे विरुध्द दिनांक ०९.०२.१९ रोजी पोलीस स्टेशन नळदुर्ग येथे भा.दं.वि.चे कलम २७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गणपती राम गुड्डु यास अटक करण्यात आली आहे.

Scanned by CamScanner

**" उपळा ते तेर रोडवर मोटारसायकलची पादचाऱ्यास धडक गुन्हा नोंद "**

**पोलीस स्टेशन उस्मानाबाद (ग्रामीण) :-** दिनांक १०.११.२०१८ रोजी १९.०० वा. सु. उपळा ते तेर रोडवर अजिंक्य चंद्रकांत काकडे रा. उपळा (मा), ता. जि. उस्मानाबाद याने त्याचे ताब्यातील मोटारसायकल क्र. एम. एच. २५ सी. २३३ ही हयगईने व निष्काळजीपणे चालवुन नानासाहेब देविदास नवले रा. उपळा (मा) यांना पाठीमागुन जोराची धडक देवुन डावे पायाचे पिंडरीजवळ गंभीर दुखापत करणेस कारणीभुत झाला आहे. म्हणुन नानासाहेब देविदास नवले यांचे फिर्यादवरुन अजिंक्य चंद्रकांत काकडे याचे विरुध्द दिनांक ०९.०२.१९ रोजी पोलीस स्टेशन उस्मानाबाद (ग्रामीण) येथे भा.दं.वि.चे कलम २७९,३३७,३३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**" मौजे येणेगुर येथे दारु पिवुन बिल देणेचे कारणावरुन मारहान "**

**पोलीस स्टेशन मुरुम :-** दिनांक ०९.०२.२०१९ रोजी २२.३० वा.सु १) सचिन अदिनाथ घोरफडे २) पृथ्वीराज नागनाथ माने दोघे रा. महालिंगराय वाडी ३) प्रविण राजेंद्र गायकवाड रा. एकोंडी ता. उमरगा यांनी मौजे येणेगुर येथील सतीश प्रभाकर येडगे यांचे मातोश्री हॉटेल व परमीट रुममध्ये येवुन दारु पिवुन बिल देणेचे कारणावरुन शिवीगाळ करुन सतीश येडगे यांना लाथाबुक्याने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली तसेच परमीट रुमचे समोरील दरवाजाचे व शोकेश चे काच फोडुन अंदाजे १०,०००/- रु. चे नुकसान केले म्हणुन सतीश प्रभाकर येडगे यांचे फिर्यादवरुन वरील आरोपीतांविरुध्द दिनांक १०.०२.१९ रोजी पोलीस स्टेशन मुरुम येथे भादंविचे कलम ३२३,५०४,५०६,४२७,३४ सह म.दा.का.चे कलम ८५(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद

**टिप :- वर नमुद दाखल गुन्हयाचे अनुषंगाने ज्या नागरिकांना त्यांचेकडे तपासास उपयुक्त अशी माहिती असेल त्यांनी संबंधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना सदरची माहिती पुरवून तपासकामी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.**

Scanned by CamScanner

# पोलीस अधीक्षक कार्यालय , उस्मानाबाद

## “ प्रेस नोट ”

पान संख्या :- ०१

वार :- रविवार

दिनांक :- १०/०२/२०१९

---

### “ पोलीस शिपाई यांचे भरती प्रक्रियेत बदल केलेबाबत ”

<u>पोलीस अधीक्षक कार्यालय उस्मानाबाद :-</u> महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्वरुपात बदल झालेला असल्याने पोलीस शिपाई पदावर बुध्दीमान उमेदवरांची निवड होण्याची आवश्वकता, पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील शारिरीक चाचणीदरम्यान होणाऱ्या दुर्घटना याबाबी विचारात घेऊन शासनाने शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, दिनांक १८०१.२०१९ व क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३८०/पोल-५अ, दिनांक १८.०१.२०१९ अन्वये भरती प्रक्रियेत बदल केलेला आहे. नवीन पध्दतीमुळे पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची लेखी परीक्षा प्रथम घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवर रिक्त होणाऱ्या पदांच्या प्रमाणात आवश्यक तेवढयाच योग्य उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी बोलाविण्यात येणार असल्याने , भरती प्रक्रिया दीर्घकाळ सुरु न राहता जलद गतीने पार पडेल. त्यामुळे जिल्याबाहेरील उमेदवारांना जास्त दिवस ताटकळत रहावे लागणार नाही. भरती प्रक्रियेत केलेल्या बदलांचा फायदा उमेदवारांना निश्चीतच होईल. असे आवाहन उस्मानाबाद जिल्हा पोलीस अधीक्षक श्री आर.राजा. यांनी केले आहे.

---

पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद

प्रति,

संपादक दैनिक........................................................

कृपया आपले दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner